<u>National Priority Programmes</u>




<u>Cleanliness Drive</u>





RADHA NAGAR
Jawaharlal Nehru Stadium
Google
WQVC+6F8, Paranjpe Colony, Amravati, Maharashtra 444603, India
Amravati
Maharashtra
India
2022-04-09(Sat) 07:35(am)
31°C
88°F

# 2nd international conference 2021

2nd INTERNATIONAL E- CONFERENCE ON CAREER AND PROFESSIONAL DEVELOPMENT Date - July 10-12th, 2021

## श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे दुसरे ई– आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन



अमरावती दि. ८ : श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे दिनांक १० जुलै ते १२ जुलै २०२१ ला करियर आणि प्रोफेशनल डेव्हलपमेंट या विषयावर दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन अभिनव बिंद्रा स्पोर्ट्स मेडिसिन आणि रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणार आहे या कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्या करिता उद्घाटक म्हणून एडवोकेट माननीय यशोमती ठाकूर महिला व बालकल्याण विकास मंत्री महाराष्ट्र राज्य प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री उदय सामंत साहेब उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य ,मा. सुनील भाऊ केदार साहेब क्रीडामंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच श्री अभिनव बिंद्रा ऑलंपिक गोल्ड मेडल विजेते शूटिंग, मा. श्री विलास जी भाले साहेब प्रभारी कुलगुरू संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, मा. डॉ. लक्ष्मीकांत राठोड कुलगुरू विश्व विद्यापीठ तेलंगणा, मा. दिलीप बाबू इंगोले साहेब कोषाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सन्माननीय श्री हर्षवर्धन देशमुख साहेब हे भूषवणार आहेत दिनांक १० जुलै २०२१ रोजी सकाळच्या चर्चासत्रात तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रोफेसर जोसेफ ओलिव्हर राज अधिष्ठाता डॉ. दीजीपाल गणावत एज्युकेशन डायरेक्टर अभिनव बिंद्रा स्पोर्ट्स मेडिसिन आणि रिसर्च इन्स्टिट्यूट, डॉ. अमित मलिक विभाग प्रमुख सोशल इम्पॅक्ट अभिनव बिंद्रा फाउंडेशन , डॉ. दिलशान अहमद असिस्टंट प्रोफेसर ऑल स्टेट विश्व विद्यापीठ, अमेरिका असे हे राहणार आहेत प्रथम चर्चासत्र करिता चेअरपर्सन म्हणून डॉ. वशिष्ठ चौबे प्राचार्य श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंजनगाव सुर्जी तसेच डॉ.संयोगिता देशमुख माजी प्राचार्य विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती हे राहतील ,दुपारच्या सत्रात डॉक्टर लिम यून होई असोसिएट प्रोफेसर मलाया विश्वविद्यापीठ कालालंपूर मलेशिया हे तज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करतील तर या चर्चासत्र करिता चेअरपर्सन म्हणून डॉ. जयंत चतुर प्राचार्य श्रीमती नानकी बाई वाधवानी कला महाविद्यालय यवतमाळ हे राहतील.दिनांक ११ जुलै २०२१ला सकाळच्या सत्रात तज्ञ मार्गदर्शन म्हणून एडवोकेट डॉ. वर्षा देशमुख प्राचार्य डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती ,एडवोकेट शीतल मेटकर ओडिसी एक्सपोनेंट व संचालक उत्कल नित्य निकेतन व प्राचार्य पंचायत राज्य प्रशिक्षक केंद्र अमरावती, श्री रवि साहू विभाग प्रमुख एम बी ए डब्ल्यू पी यु एम आय टी पुणे, श्री नितान पाठक एमबीए स्पोर्ट मॅनेजमेंट स्पोर्ट व वेलनेस इंडस्ट्री पुणे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे या चर्चासत्र करिता चेअरपर्सन म्हणून डॉ. स्मिता देशमुख प्राचार्य श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती व नॅक च्या सदस्या तसेच डॉक्टर के. चंद्र शेखरन व विभाग प्रमुख शारीरिक शिक्षण विभाग मदुराई कामराज विश्व विद्यापीठ हे चेअर पर्सन म्हणून काम सांभाळ तील. याच दिवशी दुपार च्या सत्रात डॉ. राजेश कुमार प्राचार्य शारीरिक शिक्षण महाविद्यालय उस्मानिया विश्व विद्यापीठ हैद्राबाद यांचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन लाभणार आहे व दुपार च्या सत्राला चेअर पर्सन म्हणून डॉ. तनुजा राऊत पी.जी. टी. डी. सं गा बा अमरावती विद्यापीठ तसेच डॉक्टर संगीता बिहाडे असिस्टंट प्रोफेसर श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय अमरावती हे चेअर पर्सन म्हणून काम सांभाळतील.

दिनांक १२ जुलै २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रथम चर्चा सत्राची सुरवात होईल. या चर्चा सत्रा मध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री प्रशांत चंद्रा को फौंडर टीन मिडिया कालालंपूर मलेशिया. श्री डेव्हिड डिसोझा सिनियर जर्नालिस्ट आणि पब्लिक रिलेशन कन्सल्टंट, डॉ.संगीता ईंगोले विभाग प्रमुख पर्यावरण विज्ञान श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती हे राहतील. या चर्चा सत्र करिता डॉ.अविनाश असनारे, संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सं गा बा अमरावती विद्यापीठ व डॉ. बाप्पासाहेब म्हस्के असोसिएट प्रोफेसर श्रीमती रामदास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय घनसावंगी हे चेयर परसन राहतील दिनांक १२ जुलै २०२१ रोजी ठीक १२.१५ समरोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे समरोपीय कार्यक्रमा चे दुसरे आंतरराष्ट्रीय परिषदेची सांगता होईल दुसरे ई-आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजन व नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य कन्वेनेर डॉ. अंजली ठाकरे यांच्या मार्गदर्शनात आयोजित समिती प्रा. डॉ. प्रेमसिंग सायर ऑर्गनायझेशन सेक्रेटरी श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती . डॉ.उल्हास देशमुख डॉ. पुष्पलता देशमुख, डॉ. चेतन शेंडे, श्री सुशांत कुकडे, कु. अमृता गुल्हाने डॉ. विना राठी विभाग प्रमुख इंग्रजी विभाग श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी ,डॉ. गणेश खंडारे असिस्टंट प्रोफेसर इंग्रजी विभाग यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय मंगरूळपीर डॉ. अनिकेत भुयार, असिस्टंट प्रोफेसर राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी. आंतरराष्ट्रीय परिषदेच्या यशस्वी आयोजनाकरिता अथक परिश्रम घेत आहेत.

---

**देशोन्नती** **माझं श**

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेत उदय सामंत यांचा हृदयस्पर्शी सत्कार सोहळा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अमरावती** ▪ स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती आयोजित दुसरे ई- आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमानिमित्त प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत शिवाजी शिक्षण संस्थेत उपस्थित होते. या सोहळ्यात शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीच्या मुख्यालयात उदय सामंत यांचा अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शिल्प, पुष्प, शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. हा हृदयस्पर्शी सत्कार सोहळा १० जुलैरोजी सकाळी ११ वाजता पार पडला.



या सत्कार सोहळ्याचे संचालन संस्थेचे सचिव शेषराव खाडे यांनी केले, तसेच प्रास्ताविक आणि संस्थेची भूमिका हर्षवर्धन देशमुख यांनी मांडली. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेला शासनस्तरावर असलेल्या अडचणी मांडल्या व काही निवेदने दिलीत. अतिथी भाषणात उदय सामंत यांनी आपल्या ज्या अडचणी आहेत, त्या सोडवण्याचा मी निश्चित प्रयत्न करेल, असे आश्वासन केले. कार्यक्रमापूर्वी उदय सामंत यांनी डॉ. पंजाबराव देशमुख स्मारकाला भेट दिली व स्मारकास अभिवादन केले. याप्रसंगी अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन देशमुख, तसेच अतिथी म्हणून आ. किरण सरनाईक, संस्थेचे उपाध्यक्ष गजानन पुंडकर, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, सचिव शेषराव खाडे, सदस्य माजी न्यायाधीश अशोकराव तुसे, संस्थेच्या कार्यकारिणीचे सदस्य डॉ. विजय ठाकरे, नरेश पाटील, अमोल महल्ले आदी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात करियर आणि प्रोफेशनल डेव्हलपमेंट या विषयावर दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने झूमद्वारे करण्यात आले. संबधित कार्यक्रमात ऑनलाईन पद्धतीने देशभरातील विविध तज्ञ व मुख्याध्यापकदेखील उपस्थित होते. सदर परिषद श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावतीत आयोजित केली असून डॉ. अंजली ठाकरे यांच्या मार्गदर्शनात पार पडणार आहे. तसेच वैदर्भीय कवी व प्रतिभा साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल कुलट यांच्या 'सत्तेत होरपळणारी सत्यवान माणसं' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

बुधवार, दि. १४ जुलै २०२१ www.dainikhindusthan.com हिंदुस्थान अमरावती

# श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे द्वितीय ई -आंतरराष्ट्रीय परिषदेच्या दुसऱ्या दिवसाचा शुभारंभ



अमरावती दि. १३ : श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालयात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात करतांना संचालनकर्ता कु.मयुरा फरकाडे यांनी प्रमुख अतिथी, तज्ञ मार्गदर्शक व उपस्थितांचे शब्द सुमनांनी हार्दिक स्वागत करून आजच्या दिवसाचे तज्ञ मार्गदर्शक मा.डॉ. वर्षा देशमुख प्राचार्य डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती यांचा परिचय करून दिला व त्यांना प्रोफेशनल डेव्हलपमेंट अँड एम्पावरमेंट लेजीसलेशन इन् इंडिया या विषयावर मार्गदर्शन करण्याकरिता आमंत्रित करण्यात आले. डॉ. वर्षा देशमुख यांनी मार्गदर्शन करताना स्त्रियांचे हक्क आणि अधिकार या विषयी सविस्तर माहिती विशद करून विभिन्न न्यायालयीन प्रकरणांचा उलगडा करताना कायद्यानुसार कशा प्रकारे संरक्षण देण्यात आले आहे या विषयी उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

त्यानंतर ॲडव्होकेट शितल मेटकर ओडिसी संचालक उत्कल नृत्य निकेतन अमरावती आणि प्राचार्य पंचायत राज प्रशिक्षण केंद्र अमरावती यांनी म्युझिक अँड डान्स इंटरटेनमेंट या विषयावर मार्गदर्शन करतांना जगप्रसिद्ध नृत्य प्रकाराचे वर्णन करून देत नृत्याची यशस्विता अंग, प्रत्यांग व दिव्यांग एकंदरीत एक्सप्रेशन वर अवलंबून राहते. नृत्य या कलेमुळे मानसिक, भावनात्मक व शारीरिक स्वास्थ्य अबाधित राखण्याकरिता अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

प्रथम सत्राचे सत्र प्रमुख व अध्यक्ष स्थान डॉ. स्मिता देशमुख, प्राचार्य श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांनी केले.

द्वितीय सत्रात मा. रविशंकर साहू विभागप्रमुख एम. बी. ए. डब्ल्यू. पी. यु. एम. आय.टी. पुणे यांचा श्री ज्ञानेश्वर गटकर यांनी परिचय करून देत त्यांना तज्ञ मार्गदर्शक म्हणून आमंत्रित केले. श्री रवि साहू यांनी करिअर इन् स्पोर्ट मॅनेजमेंट सीईंग बेयोंड दि गेम या विषयावर मार्गदर्शन करताना जॉब सॅटिस्फॅक्शन याविषयी सांगताना यशस्वी व्यवसाय करण्याच्या दृष्टीने विविध उदाहरणे देऊन व्यवसायाभिमुख तंत्र व मंत्र विशद केली. यानंतर श्री निनाद पाठक एम. बी. ए स्पोर्ट मॅनेजमेंट अँड स्पोर्ट इंडस्ट्री पुणे यांनी न्यू एव्हनु इन् वेलनेस इंडस्ट्री या विषयावर मार्गदर्शन केले.

तृतीय सत्रात तज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉक्टर संगीता इंगोले सहयोगी प्राध्यापिका व विभाग प्रमुख पर्यावरण विज्ञान श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती यांनी इम्पॅक्ट ऑफ क्लायमेट चेंज एक्झरसाइज चिल्ड्रेन अँड युथ या विषयावर मार्गदर्शन करताना पर्यावरणाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम या परिणामापासून वाचवण्याकरिता काय उपाय योजना करायला पाहिजे या विषयावर अत्यंत मौलिक असे मार्गदर्शन केले. त्यानंतर आंतरराष्ट्रीय परिषदेअंतर्गत प्रकाशित रिसर्च नेबुला जनरल मध्ये प्रकाशित पेपरचे प्राध्यापक व रिसर्च स्कॉलर यांनी पेपर वाचन केले. या सत्राकरिता चेअर पर्सन म्हणून डॉ.तनुजा राऊत, विभाग प्रमुख पदवीत्तर शारीरिक शिक्षण विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

डॉ. संगीता बिहाडे, सहाय्यक प्राध्यापक श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती या प्रामुख्याने उपस्थित होत्या त्यांनी संपूर्ण सत्राचे मूल्यांकन करून अहवाल सादर केला.

## प्राचिन खंडेश्वर मंदिराच्या विकासाकडे शासनाचे दुर्लक्ष

नांदगाव खंडे दि.१३ : अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर येथे ७६६ वर्ष पुरातन हेमाडपंती शिवलींग असलेले भगवान खंडेश्वर चे शिवालय आहे. येथे दरवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी मोठी यात्रा भरते, हे मंदिर अत्यंत जागृत असे आहे. मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडामध्ये रेखीव-कोरी

जनमाध्यम अमरावती, सोमवार १२ जुलै २०२१ E-paper - www.janmadhyam.com १

जनमाध्यम अमरावती, सोमवार १२ जुलै २०२१ E-paper - www.janmadhyam.com १

*श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय द्वारा आयोजित*

# आंतरराष्ट्रीय ई- परिषदेच्या प्रथम चर्चासत्राला सुरुवात




**अमरावती / का.प्र.**

प्रथम सत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये प्रोफेसर जोसेफ ओलिवर राज् अधिष्ठाता व डॉ. दिपीपाल राणावत कार्यकारी संचालक अभिनव क्रिडा स्पोर्ट्स मेडिसीन व रिसर्च इन्स्टिट्यूट यांनी करियर अपोर्च्युनिटी फिजियोथेरेपी आणि स्पोर्ट्स सायन्स या विषयावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. तसेच डॉ. दिलशाद अहमद, टीचिंग असिस्टंट ओरेगोन स्टेट विश्वविद्यापीठ यु एस ए यांनी, एम आय एलिजिबु क्वॉलिफिकेशन नीड टू बिकम इंटरनॅशनलि कोंड फिजिकल एज्युकेशन प्रोफेशनल फॉर युनिव्हर्सिटी या विषयावर अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन केले. प्रथम सत्रात मा. डॉ. वसिष्ठ चौबे प्राचार्य राधाबाई सारडा महाविद्यालय अमरावती व मा. डॉ. संयोगिता देशमुख माजी प्राचार्य विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती यांनी चेअरपर्सन म्हणून विषयावर मूल्यांकन केले.

दुपारचे सत्रात डॉ. लिंम कून हुयी असोसिएट प्रोफेसर युनिव्हर्सिटी ऑफ मलाया क्वालालंपूर मलेशिया यांनी फिजिओ लॉजिकल इफेक्ट ऑफ स्पोर्ट्स मसाज या विषयावर मार्गदर्शन करताना मसाजच्या माध्यमाने कशाप्रकारे रोजगार प्राप्त करता येऊ शकते यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या सत्रा करिता चेअरपर्सन म्हणून डॉ. जयंत चतुर प्राचार्य श्रीमती वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ यांनी मूल्यांकन करून मार्गदर्शन केले. यानंतर आंतर्राष्ट्रीय ई परिषदेअंतर्गत प्रकाशित रिसर्च नेबुला जनरल मध्ये प्रकाशित पेपर चे प्राध्यापक व रिसर्च स्कॉलर यांनी प्रेझेंटेशन करण्यात आले. प्रथम सत्राचे संपूर्ण संचालन डॉ. बिना राठी राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी यांनी केले तर द्वितीय सत्राचे संचालन प्रा. मयुरा फरकाडे विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती यांनी केले, डॉक्टर ए प्रवीण असिस्टंट प्रोफेसर डिपार्टमेंट ऑफ फिजिकल एज्युकेशन अंड स्पोर्टस पोंडीचेरी सेंट्रल युनिव्हर्सिटी., मिस अनिता कावेरी, पीएचडी स्कॉलर डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन मदुराई कामराज युनिव्हर्सिटी मदुराई, डॉ. रजनी मुरकुटे असिस्टंट प्रोफेसर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर युनिव्हर्सिटी नागपूर, श्री पंकज फोगाट, रिसर्च स्कॉलर डिपार्टमेंट ऑफ फिजिकल एज्युकेशन महर्षी दयानंद यूनिवर्सिटी रोहतक , संदीप सिंह रिसर्च स्कॉलर डिपार्टमेंट ऑफ फिजिकल एज्युकेशन राजीव गांधी यूनिव्हर्सिटी, द्रिम्या शिवदास डिपार्टमेंट ऑफ फिजिकल एज्युकेशन डी पी एस मोनाराच इंटरनॅशनल स्कूल दोहा, कतार, अभिजीत एम रिसर्च स्कॉलर डिपार्टमेंट ऑफ फिजिकल एज्युकेशन अंड स्पोर्टस. सिजु पी. जॉन, पीएचडी रिसर्च स्कॉलर तामिळनाडू फिजिकल एज्युकेशन अंड स्पोर्टस युनिव्हर्सिटी चेन्नई.

# शिवाजी महाविद्यालयाच्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात उलगडले महिला विश्व

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे आंतरराष्ट्रीय ऑनलाईन सेमिनार आणि कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत तिसऱ्या



दिवशी डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या सह प्रा.डॉ.वर्षा देशमुख यांनी महिला विश्व उलगडले.

या चर्चासत्रात डॉ.राजेशकुमार, हैद्राबाद येथील डॉ.लक्ष्मीकांत राठोड, तसेच प्रा.डॉ.वर्षा देशमुख यांनी सहभाग नोंदविला. या सत्रात डॉ.वर्षा देशमुख यांनी घरगुती हिंसा, लिव्ह इन रिलेशनशिप, महिलांचे अधिकार• कायदा, महिलांच्या समस्या यावर विचार मांडले. तसेच महिलांना प्रत्येक क्षेत्रात प्रमुख स्थानी मिळणारी दुय्यम वागणूक, राजकारण व महत्वाच्या जागी महिलांच्या समस्या त्यांनी मांडल्या. तर आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन पटू गोपीचंद पुलेल यांनी सहभागी होऊन 'शारीरिक शिक्षणाचे ध्येय' या विषयावर मत मांडतांना आपला प्रवास उलगडला. आंतरराष्ट्रीय स्तरावर बॅडमिंटनचे कार्य व महत्वाच्या मुद्द्यांवर त्यांनी प्रकाश टाकला. तसेच मान्यवरांनी आयोजन समितीचे कौतुक केले.

चर्चासत्रात अमित मलिक यांनी 'फिजीकल लीडरशी' या विषयावर मत मांडले. तसेच शारीरिक शिक्षणामध्ये व खेळात लहान मुलांचे मनोबल वाढविले पाहिजे त्याकरीता मुलांचे प्रतिनिधीत्व पालकांनी करून त्यांना प्रेरणा द्यावी असे मत त्यांनी व्यक्त केले. वसह डॉक्टर अंजली टाकरे, सचिन निचले आदिंनी चर्चासत्रात सहभागी मान्यवरांचे आभार मानले.

भोजन अवकाशानंतरच्या सत्रात डॉ.बाबासाहेब म्हस्के, डॉ.तनुजा राऊत यांनी सहभाग नोंदविला. याअंतर्गत मधुराई येथील कामराज विद्यापिठाचे चंद्रशेखरन मधुराई यांनी 'प्रॉस्पेक्टस इन योगा प्रॅक्टीसेस' या विषयावर विचार मंथन केले. हैद्राबादचे डॉ.विजेंद्र चेनोबो यांनी 'कोविड-१९मानवी जीवनावरील परिणाम' या विषयावर प्रकाश टाकला.

कोविड १९ दरम्यान ताण-तणावाचे व्यवस्थापन करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. डॉ.बाबासाहेब म्हस्की व राऊत यांनी सहभागी मान्यवरांचे आभार मानले. या सत्रामध्ये एन.सी.टी.ई पश्चिम विभाग अध्यक्ष डॉ.रविंद्र कडू, डॉ. संयोगिता देशमुख, डॉ.स्मिता देशमुख, डॉ.सुजाता झाडे आदींची विशेष उपस्थिती होती.

सेमिनार आणि कार्यशाळेच्या आयोजन समितीचे राजेंद्र डोंगरे, डॉ.उल्हास देशमुख, डॉ. प्रेमसिंग सायर, डॉ. चेतन शेंडे, स्वाती नेहाटकर,विनोद मसराम, अमृता गुल्हाने,शंकर राऊत, राजेंद्र वानखेडे, स्वाती देशमुख, धीरज देशमुख, ज्ञानेश्वर ठाकरे, प्रमोद इंगळे,प्रथमेश माहुलकर आदींनी परिश्रम घेतले. या सत्राचे सूत्रसंचालन संदीप जगताप, सचिन नोचळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. पुष्पलता देशमुख यांनी केले.

***On the Occasion of Dr. S.R. Ranganathan Birth Anniversary & Webinar Date 9 August 2021(Dainikhindhstan Paper)***



# डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्य राष्ट्रीय वेबिनार संपन्न






अमरावती दि. १० : श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित, श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे दिनांक ९ ऑगस्ट २०२१ सोमवार रोजी डॉक्टर एस. आर. रंगनाथन जयंतीच्या प्रित्यर्थ दुसऱ्या राष्ट्रीय वेबिनार चे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाच्या आयोजनाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.अंजली ठाकरे , उद्घाटक रिसर्च अँड करियर अंड कौन्सिलिंग सेल चे उद्घाटन डॉ वर्षा देशमुख, प्राचार्य डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती यांनी केले. त्यानंतर डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे मॅडम यांचे स्वागत प्रा.सुशांत कुकडे यांनी केले. कार्यक्रमाच्या उद्घाटक डॉ. वर्षा देशमुख यांचे स्वागत प्रा.डॉ. पी. एस. सायर यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अंजली ठाकरे मॅडम यांनी कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.वर्षा देशमुख यांचे प्राचार्यपदी नवीन नियुक्ती झाल्याबद्दल शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयातील बीपीएड ची विद्यार्थिनी समीक्षा बर्वे हिला बेस्ट लायब्ररी विजिटर अवार्ड पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आला. तसेच डी वाय एड चा विद्यार्थी सुमन कुमार याला बेस्ट लायब्ररी यूजर अवॉर्ड देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर भाषण महाविद्यालयातील सहाय्यक ग्रंथपाल सौ स्वाती न्याहटकर यांनी केले. कार्यक्रमाला उपस्थित तज्ञ मार्गदर्शक डॉ.शालिनी लिहीतकर सहयोगी प्राध्यापक, लाइब्ररी इंफर्मिशन सायन्स, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचा परिचय डॉ. विनोद मसराम यांनी केला तसेच दुसरे तज्ञ मार्गदर्शक डॉ.शांताश्री सेनगुप्ता मुख्य ग्रंथपाल मॉडन आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालय पुणे यांचा परिचय प्रा. सुशांत कुकडे यांनी केले.

यानंतर राष्ट्रीय वेबिनार मध्ये प्रथम सत्रात तज्ञ मार्गदर्शक डॉक्टर शालिनी लीहितकर यांनी plagiarism and ways to avoid it in research and publication या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर दुसऱ्या सत्रातील तज्ञ मार्गदर्शक डॉक्टर शान्ताश्री सेनगुप्ता यांनी rebuilding of college library and information centre for NAAC या विषयावर उत्कृष्ट मार्गदर्शन केले यानंतर महाविद्यालयाचे खट-उ समन्वयक डॉक्टर पी एस सायर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा विशद केला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील बीपीएड दोन वर्षीय, बीपीएस तीन वर्षीय, डि वा इड एक वर्षीय अभ्यासक्रमातील विद्यार्थी आभासी पद्धतीने उपस्थित होते. तसेच अनेक महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापक या कार्यक्रमाला आभासी पद्धतीने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयुरा फरकाडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील वरिष्ठ डॉ यु.व्ही. देशमुख, डॉ.पी एस सायर, डॉ. कुमारी पी एम देशमुख, डॉ. चेतक शेंडे, प्रा. सुशांत कुकडे, व शिक्षकेतर कर्मचारी श्री निलेश ठाकरे, डॉ. विनोद मसराम, , सौ स्वाती न्याहतकर, सौ स्वाती देशमुख, कु.अमृता गुल्हाने, श्री प्रमोद इंगळे, श्री धीरज देशमुख, श्री प्रदीप झांबरे, श्री ज्ञानेश्वर ठाकरे यांनी अथक परिश्रम घेतले तसेच कार्यक्रमाचे आभासी पद्धतीने आयोजन करण्याकरिता एडमिन म्हणून कुमारी अमृता गुल्हाने व सचिन नीचले यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयातील प्रा.डॉ.चेतक शेंडे यांनी केले.

*2nd National webinar on"Rebulding of College Libraries for NAAC on 9th August2021 at 11.30a.m to 3.30 p.m.*

***On the Occasion of Dr. S.R. Ranganathan Birth Anniversary & Webinar Date 9 August 2021(Janmadhyam Paper)***

# शिवाजी शिक्षण संस्थेत राष्ट्रीय वेबिनार

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे डॉ.एस. आर. रंगनाथन जयंतीच्या प्रित्यर्थ दुस-या राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या आयोजनाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे, रिसर्च अँड करियर कौन्सिलिंग सेल चे उद्घाटन डॉ. वर्षा देशमुख यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ. अंजली ठाकरे यांचे स्वागत प्रा.सुशांत कुकडे यांनी केले. कार्यक्रमाच्या उद्घाटक डॉ. वर्षा देशमुख यांचे स्वागत प्रा.डॉ. पी. एस. सावर यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अंजली ठाकरे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.वर्षा



देशमुख यांचे प्राचार्यपदी नवीन नियुक्ती झाल्याबद्दल शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर बीपीएडची विद्यार्थिनी समीक्षा दर्वे हिला बेस्ट लायब्ररी विजिटर अवार्ड पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आला. तसेच डीवायएडचा विद्यार्थी सुमन कुमार याला बेस्ट लायब्ररी युजर अवॉर्ड देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

प्रास्ताविक ग्रंथपाल स्वाती न्याहटकर यांनी केले. कार्यक्रमाला सहयोगी प्राध्यापक डॉ. शालिनी लिहीतकर यांचा परिचय डॉ. विनोद मसराम यांनी केला.

दुसरे तज्ञ मार्गदर्शक डॉ.शांतश्री सेनगुप्ता यांचा परिचय प्राध्यापक सुशांत कुकडे यांनी केले. यानंतर राष्ट्रीय वेबिनार मध्ये प्रथम सत्रात तज्ञ मार्गदर्शक डॉक्टर शालिनी लीहितकर यांनी 'plagiarism and ways to avoid it in research and publication' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर दुस-या सत्रातील तज्ञ मार्गदर्शक डॉक्टर शान्ताश्री सेनगुप्ता यांनी 'rebuilding of college library and information centre for NAAC' या विषयावर उत्कृष्ट मार्गदर्शन केले. यानंतर महाविद्यालयाचे 'IQAC' समन्वयक डॉ.पी एस सावर यांनी कार्यक्रमाचा आढावा घेतला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील बीपीएड दोन वर्षीय, बीपीएस तीन वर्षीय, डिवाइड एक वर्षीय अभ्यासक्रमातील विद्यार्थी आभासी पद्धतीने उपस्थित होते. संचालन प्रा.मयुरा फरकाडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील वरिष्ठ प्रा.डॉ यु.व्ही.देशमुख, प्रा.डॉ.पी.एस. सावर, प्रा.डॉ. पी.एम. देशमुख, प्रा.डॉ.चेतक शेंडे, प्रा. सुशांत कुकडे व शिक्षकेतर कर्मचारी निलेश ठाकरे, डॉ. विनोद मसराम, अशोक जगताप, स्वाती न्याहलकर, स्वाती देशमुख, अमृता गुल्हाने, प्रमोद ईंगळे, धीरज देशमुख, प्रदीप झांबरे, ज्ञानेश्वर ठाकरे यांनी अथक परिश्रम घेतले तसेच कार्यक्रमाचे आभासी पद्धतीने आयोजन करण्याकरिता एडमिन म्हणून कुमारी अमृता गुल्हाने व सचिन नीचळे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयातील प्रा. डॉ.चेतक शेंडे यांनी केले.

***Dr. S.R. Ranganathan Birth Anniversary & Webinar Date 9 August 2021(Amravati Mandal)***

# डॉ.एस.आर.रंगनाथन जयंती पर वेबिनार



**प्रतिनिधि/दि.११**

**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित शिवाजी शारीरिक शिक्षा महाविद्यालय में डॉ. एस.आर. रंगनाथन जयंती निमित्त द्वितीय राष्ट्रीय वेबिनार का आयोजन किया गया. कार्यक्रम का उद्घाटन प्राचार्या डॉ. अंजलि ठाकरे, उद्घाटन अनुसंधान व करियर तथा परामर्श प्रकोष्ठ का उद्घाटन डॉ. वर्षा देशमुख ने किया. पश्चात डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहब देशमुख व एस.आर. रंगनाथन की प्रतिमा की पूजा व दीप प्रज्वलित कर कार्यक्रम की शुरुआत की गई.

कार्यक्रम में सहायक पुस्तकालयाध्यक्ष स्वाति न्याहटकर ने परिचयात्मक भाषण दिया. इस समय डॉ. शालिनी लिहितकर ने साहित्यिक चोरी तथा शोध व प्रकाशन में इससे बचने के उपायों पर मार्गदर्शन किया.

पश्चात डॉ. शांतश्री सेनगुप्ता ने नैक के लिए महाविद्यालय पुस्तकालय एवं सूचना केंद्र के पुनर्निर्माण पर मार्गदर्शन किया. कार्यक्रम में कॉलेज के दो वर्षीय बीपीएडी, तीन वर्षीय बीपीएस और एक वर्षीय डिप्लोमा छात्रों ने भाग लिया. संचालन प्रो. मयूरा फड़कड़े ने व आभार प्रदर्शन प्रो. डॉ. चेतक शेंडे ने किया. कार्यक्रम की सफलतार्थ डॉ. यू.वी. देशमुख, प्रो. डॉ. पी.एस. सावर, प्रो. डॉ. कुमारी, पीएम देशमुख, प्रो. डॉ. चेतक शेंडे, प्रो. सुशांत कुकडे, शिक्षकेतर कर्मचारी नीलेश ठाकरे, डॉ. विनोद मसराम, अशोक जगताप, स्वाति न्याहटकर, स्वाति देशमुख, अमृता गुल्हाने, प्रमोद इंगले, धीरज देशमुख, प्रदीप झाकरे, ज्ञानेश्वर ठाकरे ने परिश्रम किया.

## विद्याभारती महाविद्यालय में डॉ. रंगनाथन जयंती

कैम्प स्थित विद्याभारती महाविद्यालय में ग्रंथालय व माहिती शास्त्र विभाग के संयुक्त तत्वावधान में डॉ. एस.आर. रंगनाथन की १२९ वीं जयंती



मनाई गई. महाविद्यालय की प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर की अध्यक्षता में आयोजित कार्यक्रम में प्रमुख अतिथि के रूप में स्नातकोत्तर जोग दीपशिखा गुरुकुल सैनिक स्कूल चिखलदरा के निवृत्त प्राचार्य अनिल प्रांजले, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. आर.एम. पाटील, ग्रंथपाल डॉ. विशाल शेखावत उपस्थित थे. सत्र के बेस्ट रीडर के रूप में डॉ. वी.पी.शेकोकार व श्रीकांत तबाले का सत्कार किया गया. कार्यक्रम का प्रास्ताविक डॉ. विशाल शेखावत ने, संचालन अनिल मेश्राम ने व आभार प्रदर्शन गोपाल ठाकूर ने किया. कार्यक्रम को सफल बनाने अनिल मोरे, रविन्द्र रामचवरे, शाहीन आली, संगीता भोसले, निधी चांडक, वैष्णवी भारसाकले आदि ने प्रयास किया.

**Dr. Panjabrao Deshmukh Punyatithi Mahotsav**
**BadiRaja aatm Samman Dawood**

प्रतिदिन अखबार
www.pratidinakhabar.com
11 apr 2022

# बळीराजा आत्मसम्मान दौड़ में 400 से अधिक विद्यार्थियों का सहभाग

## डॉ. पंजाबराव देशमुख की पुण्यतिथि निमित्त आयोजन

प्रतिनिधि, 10 अप्रैल

**अमरावती** - शिक्षा महर्षि डॉ.पंजाबराव उर्फ भाऊसाहब देशमुख की 57वीं पुण्यतिथि निमित्त स्थानीय श्री शिवाजी शारीरिक शिक्षा महाविद्यालय, श्री शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाला की ओर से संयुक्त तौर पर बळीराजा आत्मसम्मान दौड़ का आयोजन किया गया था. 10 अप्रैल की सुबह 7 बजे स्थानीय श्री शिवाजी शारीरिक शिक्षा महाविद्यालय से यह दौड़ शुरू हुयी. स्पर्धा के उद्घाटन समारोह में अध्यक्ष के तौर पर श्री शिवाजी शिक्षा संस्था के उपाध्यक्ष एड. गजानन पुंडकर, उद्घाटक संस्था के सदस्य हेमंत काळमेघ, प्रमुख अतिथि संस्था के मनोनीत सदस्य नरेश पाटिल, प्राचार्या डॉ.अंजलि ठाकरे, सुधीर माळवे उपस्थित थे.कार्यक्रम का आरंभ डॉ.पंजाबराव उर्फ भाऊसाहब देशमुख की प्रतिमा का पूजन तथा माल्यार्पण कर किया गया. पश्चात उपस्थित मान्यवरों का स्वागत पुष्पगुच्छ प्रदान कर किया गया. एड.गजानन पुंडकर तथा उपस्थित मान्यवरों के हाथों सामूहिक क्रीड़ा ज्योति का प्रज्वलन किया गया. उसके बाद स्थानीय श्री शिवाजी शारीरिक शिक्षा महाविद्यालय की छात्रा श्रुति प्रकाश बडेरे ने अभा अंतरविवि स्पर्धा में मलखांब में मेडल प्राप्त कर प्रतिष्ठा की खेलो इंडिया स्पर्धा में उसका चयन होने के प्रति उपस्थित मान्यवरों के हाथों उसका शाल, श्रीफल प्रदान कर सम्मानित किया





गया. पश्चात संस्था के सदस्य हेमंत काळमेघ ने बळीराजा आत्मसम्मान दौड़ की शुरुआत हरी झंडी दिखाकर की. इस दौड़ में अंतर महाविद्यालयीन तथा शाला के 400 से अधिक खिलाड़ी विद्यार्थियों ने सहभाग लिया. उसमें पुरुष तथा महिला जूनियर गुट के लिए 2 किलोमीटर, सीनियर गुट के लिए 3 किलोमीटर दौड़ संपन्न हुयी. इस दौड़ के पश्चात सभी सहभागी विद्यार्थियों को मान्यवरों के हाथों प्रमाणपत्र प्रदान किया गया. कार्यक्रम का संचालन तथा आभार प्रदर्शन संदीप इंगोले ने किया. इस दौड़ की सफलतार्थ स्थानीय श्री शिवाजी शारीरिक शिक्षा महाविद्यालय तथा स्थानीय श्री शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाला के शिक्षकों, शिक्षकेत्तर कर्मचारियों व विद्यार्थियों ने कड़े परिश्रम किये.

वर्ष-13 अंक-25
सूर्योदय -06.00 सूर्यास्त-06.29
ATI/RNP/300/2014-2016 MAH MAR/2010/37995
मराठी दैनिक
वृत्त केसरी
13
11.04.22
अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा व वर्धा येथे प्रकाशित
अमरावती, सोमवार 11 एप्रिल 2022 पृष्ठे - 8 ₹4.00

❖ शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुखांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्त

# बळीराजा आत्मसन्मान दौड उत्साहात



**श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे आयोजन**

प्रतिनिधी/१०एप्रिल

**अमरावती : शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्त्याने श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, व श्री शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळा ,अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने बळीराजा आत्मसन्मान दौडचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार ही दौड १० एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथून सुरू झाली.**

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी ॲड. गजानन पुंडकर, उपाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तसेच उद्घाटक म्हणून हेमंत काळमेघ, सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, त्याचप्रमाणे प्रमुख अतिथी म्हणून नरेश पाटील स्वीकृत सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, तसेच बळीराजा दौंडचे आयोजक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती चे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे व श्री शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळा, अमरावतीचे मुख्याध्यापक सुधीर माळवे उपस्थित होते. सदर बळीराजा आत्मसन्मान दौड च्या कार्यक्रमाची सुरुवात डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व प्रतिमेला हारर्पण करून झाली.



अमरावती: कार्यक्रमाला उपस्थित ॲड गजानन पुंडकर, हेमंत काळमेघ व अन्य

श्री शिवाजी संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर यांच्या व उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते व सामूहिक क्रीडा ज्योत प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालयाची विद्यार्थीनी श्रुती बडेरेनी अ.भा. आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये मल्लखांब या क्रीडा प्रकारात पदक प्राप्त केले. त्यानंतर उद्घाटक श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सदस्य हेमंत काळमेघ यांनी बळीराजा आत्मसन्मान दौड ची सुरुवात हिरवी झेंडी दाखवून केली.

सदर बळीराजा आत्मसन्मान दौड मध्ये आंतर महाविद्यालयीन व शाळेचे ४०० हून अधिक खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यामध्ये पुरुष वर्ग व महिला वर्ग जुनिअर गटासाठी २ व सीनियर गटासाठी ३ किलोमीटर अशा पद्धतीचे आंतरपार करून दौड संपन्न झालीसदर दौड नंतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सन्माननीय मान्यवर यांच्या हस्ते सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले सदर बळीराजा दौड या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन संदीप इंगोले यांनी केले. तसेच या बळीराजा आत्मसन्मान दौडसाठी श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय व श्री शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळेच्या सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# Covid vaccination 2021







nandal.com ▪वर्ष २८ ▪अंक १७२ ▪शुक्रवार १४ जनवरी २०२२ ▪पृष्ठ १२ ▪४.०० ▪संपादक: अनिल अग्रवाल

महाराष्ट्र का सबसे बड़ा व नंबर 1 शाम का अखबार

अमरावती मंडल

email amravatimandal11@gmail.com ▪ Postal Regi. No.: AMT/RNP/ 370/2020-2022

# शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय में टीकाकरण शिविर

## शिक्षकों सहित छात्र–छात्राओं ने लिया लाभ

**प्रतिनिधि/ दि. १४**

**अमरावती** - स्थानीय श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय के संयुक्त तत्वावधान में गुरुवार को युवा स्वास्थ्य मिशन तथा जिलाधिकारी पवनीत कौर व्दारा ३ जनवरी को बुलाई गई सभा में दिए गए निर्देशों के अनुसार कार्यालय सहित संचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग के ७ जनवरी के पत्रानुसार महाविद्यालय के विद्यार्थियों के कोरोना टीकाकरण शिविर का आयोजन किया गया था. उच्च तंत्र शिक्षण विभाग शासन के आदेशानुसार राज्य के महाविद्यालयीन विद्यार्थियों का टीकाकरण किए जाने के उद्देश्य से महाविद्यालयों में टीकाकरण शिविर का आयोजन युवा स्वास्थ्य मिशन के नाम पर किए जाने का निर्णय लिया गया था.





उसी के अनुसार श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय की प्राचर्य डॉ. अंजली ठाकरे व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय के प्रचार्य डॉ. विनय राउत के नेतृत्व में टीकाकरण शिविर का आयोजन किया गया था. इस शिविर का महाविद्यालय की छात्र-छात्राओं ने लाभ लिया जिसमें क्षितिज मोहोड, मंथन राठोड, प्रणाली सवाईशाह, गौरव सगणे, रुपाली गायकवाड, अमृता सोलंके, सुचिता सोलंके, उन्नति वाघमारे, विकास दारशिंबे, संतोष धुर्वे, आरती दिकार, संजय पटेल, मो. उमेर आलम, पार्थ जोग, हर्षद बाभुलकर, संतोष सीताराम, शालिनी भोसले का समावेश था. उसी प्रकार शिक्षकों में प्रा. सुशांत कुकडे, महाविद्यालय में कार्यरत सफाई कामगार विनोद पासरे का भी समावेश रहा. टीकाकरण शिविर में कोविक्सीन का पहला व दूसरा डोज दिया गया. शिविर मे जिला सामान्य अस्पताल की प्रीति मेश्राम, नलिनी मेश्राम, एस.एम. रामटेके तथा मनपा के शिक्षक एस.के. असलम, मो. फिरोज व्दारा योगदान दिया गया. टीकाकरण शिविर को सफल बनाने के लिए महाविद्यालय के सभी शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थियों ने अथक प्रयास किए.

मातृभूमि

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात लसीकरण शिबिर

**प्रतिनिधी/ १४ जानेवारी**

**अमरावती :** स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमानाने 13 जाने. रोजी युवा स्वास्थ्य मिशन व जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार तसेच सहसंचालक उच्च शिक्षण यांच्या पत्रानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता कोरोना प्रतिबंध लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले.



महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे व श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय राऊत यांच्या नेतृत्वात लसीकरणाची मोहीम सुरू करण्यात आली.शिबिराचा महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनी क्षितिज मोहोड, मंथन राठोड, कु. प्रणाली सवाईशहा, गौरव सगणे, कु. रूपाली गायकवाड, कु. अमृता सोळंके, कु. सुचिता सोळंके कु. उन्नती वाघमारे, विलास दारशिंबे, संतोष धुर्वे, कु. आरती दिकार, संजय पटेल, मोहम्मद उमेर आलम, पार्थ जोग, हर्षद बाभुळकर, संतोष सिताराम, शालिनी भोसले यांच्यासह शिक्षक प्रा. सुशांत कुकडे, सफाई कामगार विनोद पासरे यांनीही लाभ घेतला. कोविशिल्ड, को -व्हॅक्सिन लसीचा पहिला व दुसरा डोस उपलब्ध होता. लसीकरणाकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयातील स्टाफ प्रिती मेश्रा नलिनी मेश्राम, एस. एम रामटे तसेच महानगरपालिकेतील शिक्षक एस. के असलम, मोहम्मद फिरोज, जितेंद्र हर्षे, सागर बावणे यांच्याद्वारे लसीकरण करण्यात आले. लसीकरणाच्या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. चेतक शेंडे होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले.

# Inter College Cross Country tournament 2021-22

मराठी दैनिक
वृत्त केसरी 12 21.12.21
अमरावती, मंगळवार 21 डिसेंबर 2021 पृष्ठे - 8

शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात आयोजन

## आंतर महाविद्यालयीन क्रॉसकन्ट्री स्पर्धा उत्साहात




अमरावती : कार्यक्रमाला उपस्थित शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, विभागीय उपसंचालक विजय संतान, माजी महापौर विलास इंगोले तसेच स्पर्धेत सहभागी खेळाडू

प्रतिनिधी/२० डिसेंबर

अमरावती : स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, येथे स. गा. बा. अमरावती विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन क्रॉसकन्ट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेस १९ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथून सुरुवात झाली होऊन तेथेच सांगताची करण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी अध्यक्षस्थानी हर्षवर्धन देशमुख अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तसेच उद्घाटक म्हणून दिलीपबाबू इंगोले, कोषाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, त्याचप्रमाणे उद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून विजय संतान विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा अमरावती, माजी महापौर विलासभाऊ इंगोले, स. गा. बा अमरावती विद्यापीठ क्रीडा शारीरिक शिक्षण व मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असणारे, प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे व आयोजन समितीचे प्रमुख डॉ. उल्हास देशमुख, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, महाविद्यालयीन खेळाडू, विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक, प्रशिक्षक उपस्थित होते. स्पर्धा कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुख व कर्मयोगी गाडगे बाबा महाराज महाराज यांच्या प्रतिमेला हारर्पण व सामूहिक ज्योत प्रज्वलन करून झाली त्यानंतर संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष हर्षवर्धन जी देशमुख साहेब यांनी आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेची सुरुवात हिरवी झेंडी दाखवून केली. या आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेमध्ये ४७ हून अधिक महाविद्यालयीन खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व पुरुष वर्ग व महिला वर्ग नी दहा किलोमीटर अंतर पार करून स्पर्धा संपन्न केली. त्यानुसार आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतील विजेते खेळाडू विद्यार्थी सहाव्या क्रमांकावर अनिता चिमोटे डी सी पी ई कॉलेज अमरावती, पाचव्या क्रमांकावर अश्विनी पाचाडे महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती, चौथ्या क्रमांकावर दिपाली भावे राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी, तिसऱ्या क्रमांकावर अपेक्षा वाघमारे महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती, दुसऱ्या क्रमांकावर ऋजुजा कवठाले दादासाहेब राजपूत महाविद्यालय मलकापूर आणि पहिल्या क्रमांकावर जलवंती जामनकर डी सी पी ई महाविद्यालय अमरावती त्याचप्रमाणे मुलांमध्ये सहाव्या क्रमांकावर सविधान हिवराडे श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अकोला, पाचव्या क्रमांकावर संजय पटेल श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, चौथ्या नंबर वर सुरज गोडखासे मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम, तिसऱ्या क्रमांकावर संघर्ष खिल्लारे मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम, दुसऱ्या क्रमांकावर ऋषभ तीवसकर महात्मा फुले महाविद्यालय वरुड व पहिल्या क्रमांकावर प्रशिक थेटे गाडगे महाराज महाविद्यालय वलगाव या सर्व विजेते विद्यार्थ्यांना सन्माननीय मान्यवर यांच्या हस्ते व शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती यांच्या वतीने पारितोषिक देण्यात आले. या आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे स्पर्धेचे आयोजक डॉ. उल्हास देशमुख व डॉ चेतक शेंडे महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अतोनात परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.

जनमाध्यम
अमरावती, मंगळवार, २१ डिसेंबर, २०२१ ६

## शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन क्रॉसकन्ट्री स्पर्धा

### ४७ हून अधिक महाविद्यालयीन खेळाडुंचा सहभाग




अमरावती/का.प्र.

स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, येथे स.गा.बा. अमरावती विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन क्रॉसकन्ट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते स्पर्धा श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथून सुरू झाली. या आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेमध्ये ४७ हून अधिक महाविद्यालयीन खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व पुरुष वर्ग व महिला वर्गाने दहा किलोमीटर अंतर पार करून स्पर्धा संपन्न केली

स्पर्धेचे उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी अध्यक्षस्थानी हर्षवर्धन देशमुख तसेच उद्घाटक म्हणून दिलीपबाबू इंगोले, त्याचप्रमाणे उद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून विजय संतान, माजी महापौर विलास इंगोले व संचालक डॉ. अविनाश असणारे, प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे व आयोजन समितीचे प्रमुख डॉ. उल्हास देशमुख, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयीन खेळाडू, विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक, प्रशिक्षक उपस्थित होते.

स्पर्धा कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुख व कर्मयोगी गाडगे बाबा महाराज महाराज यांच्या प्रतिमेला हारर्पण व सामूहिक ज्योत प्रज्वलन करून झाली त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन जी देशमुख यांनी आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेची सुरुवात हिरवी झेंडी दाखवून केली.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतील विजेते खेळाडू विद्यार्थी सहाव्या क्रमांकावर अनिता चिमोटे डी सी पी ई कॉलेज अमरावती, पाचव्या क्रमांकावर अश्विनी पाचाडे महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती, चौथ्या क्रमांकावर दिपाली भावे राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगाव सुर्जी, तिसऱ्या क्रमांकावर अपेक्षा वाघमारे महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती, दुसऱ्या क्रमांकावर ऋजुजा कवठाले दादासाहेब राजपूत महाविद्यालय मलकापूर आणि पहिल्या क्रमांकावर जलवंती जामनकर डी सी पी ई महाविद्यालय अमरावती यांनी क्रमांक पटकाविला.

त्याचप्रमाणे मुलांमध्ये सहाव्या क्रमांकावर सविधान हिवराडे श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अकोला, पाचव्या क्रमांकावर संजय पटेल श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, चौथ्या नंबर वर सुरज गोडखासे मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम, तिसऱ्या क्रमांकावर संघर्ष खिल्लारे मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम, दुसऱ्या क्रमांकावर ऋषभ तीवसकर महात्मा फुले महाविद्यालय वरुड व पहिल्या क्रमांकावर प्रशिक थेटे गाडगे महाराज महाविद्यालय वलगाव या सर्व विजेते विद्यार्थ्यांना सन्माननीय मान्यवर यांच्या हस्ते व शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती यांच्या वतीने पारितोषिक देण्यात आले.

या आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे स्पर्धेचे आयोजक डॉ. उल्हास देशमुख व डॉ चेतक शेंडे महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अतोनात परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.

आरएनआय क्रमांक :- 59872/94

महाराष्ट्र का सबसे बड़ा व नंबर 1 शाम का अखबार

# अमरावती मंडल

email:amravatimandal11@gmail.com Postal Regi. No.: AMT/RNP/370/2020-2022 कार्यालय नं. 2566600 / 2550850

e-paper चाहिए तो इस नंबर पर रिक्वेस्ट भेजे - ७७९८८४७२७१

सोमवार २० दिसंबर २०२१



# अंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा का समापन

## ४७ से अधिक महाविद्यालयीन खिलाडियों ने लिया सहभाग

प्रतिनिधि/ दि.२०

अमरावती- स्थानीय श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय में संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत अंतर महाविद्यालयीन क्रास कंट्री स्पर्धा का आयोजन रविवार को किया गया था.





यह स्पर्धा सुबह ७ बजे शिवाजी शारीरिक शिक्षा महाविद्यालय से शुरु होकर यहीं पर समाप्त हुई. स्पर्धा का उद्घाटन समारोह की अध्यक्षता शिवाजी शिक्षण संस्था के अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख ने की. इस अवसर पर कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, खेल व युवक सेवा विभागीय उपसंचालक विजय संतान, पूर्व महापौर विलास इंगोले, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ के क्रीडा शारीरिक व शिक्षा मंडल के संचालक डॉ.अविनाश असनारे, प्राचार्य डॉ.अंजली ठाकरे, आयोजन समिति प्रमुख डॉ.उल्हास देशमुख आदि उपस्थित थे. अंतर महाविद्यालयीन क्रास कंट्री स्पर्धा में ४७ से अधिक महाविद्यालयीन खिलाडी छात्रों ने सहभाग लिया. अंतर महाविद्यालयीन स्पर्धा के विजेता खिलाडियों में लडकियों में छटवे नंबर पर अनिता चिमोटे, पांचवे नंबर पर अश्विनी पाचाडे, चौथे नंबर पर दीपाली भावे, तीसरे नंबर पर अपेक्षा वाघमारे, दूसरे नंबर पर ऋतुजा कवटाले और पहले नंबर पर जलवंती जामनकर रही. वहीं लडकों में छटवे स्थान पर संविधान हिवराले, पांचवे नंबर पर संजय पटेल, चौथे नंबर पर सूरज गोडखासे, तीसरे नंबर पर संघर्ष खिल्लारे, दूसरे नंबर पर ऋषभ तिवसकर और पहले नंबर प्रशिक थेटे रहे. अंतर महाविद्यालयीन क्रास कंट्री स्पर्धा के सफलतार्थ महाविद्यालय के प्राचार्य डॉ.अंजली ठाकरे, आयोजक डॉ.उल्हास देशमुख व डॉ.चेतक शेंडे सहित अन्यों ने प्रयास किया.



# International Women Day 2022


# अमरावती मंडल

अमरावती, मंगलवार, ८ मार्च २०२२


# विश्व महिला दिवस पर निकली भव्य महिला रैली





**प्रतिनिधि/दि.८**

**अमरावती-** विश्व महिला दिवस के अवसर पर शहर पुलिस आयुक्तालय, रोटरी क्लब ऑफ अंबानगरी अमरावती तथा श्री शिवाजी शारीरिक शिक्षा महाविद्यालय के संयुक्त तत्वावधान में महिलाओं व युवतियों का समावेश रहनेवाली भव्य बाईक रैली निकाली गई. जिसमें महिला सशक्तीकरण हेतु जनजागृति के लिए बैनर व पोस्टर लेकर सभी युवतियां व महिलाएं शामिल हुई थी. इस बाईक रैली का शुभारंभ शहर पुलिस के कवायत मैदान से हुआ. जहां पर पुलिस आयुक्त डॉ. आरती सिंह सभी उपस्थितों को विश्व महिला दिवस की शुभकामनाएं देने के साथ ही हरी झंडी दिखाकर इस बाईक रैली को रवाना किया. पश्चात यह बाईक रैली शहर पुलिस के कवायत मैदान से निकलकर चपरासीपुरा चौक, जीजाऊ चौक, आरटीओ चौक, पंचवटी, इर्विन चौक, मालवीय चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, रेल्वे स्टेशन चौक, बस स्टैंड होते हुए दुबारा शहर पुलिस आयुक्तालय के कवायत मैदान पहुंची. जहां पर इस रैली का समारोहपूर्वक समापन किया गया.

## झुंबा डान्स रहा आकर्षण का केंद्र

इस आयोजन के दौरान महिलाओं व युवतियों के एक समूह द्वारा झुंबा डान्स की प्रस्तुति भी दी गई. जो सभी के आकर्षण का केंद्र रही. इस पूरे आयोजन में सभी महिलाओं व युवतियों ने बडे उत्साह के साथ हिस्सा लिया. साथ ही रैली के दौरान भी महिला जनजागृति के लिए प्रेरक घोषणाएं दी गई.

---


दिव्य मराठी

# दिव्य सिटी

अमरावती, बुधवार, ९ मार्च २०२२ | फाल्गुन शु. ७, शके १९४३




संगीताच्या तालावर व्यायाम...

## झुम्बा डान्स

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, रोटरी क्लब ऑफ अंबानगरी अमरावती, रोटरॅक्ट क्लब, विदर्भ विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पोलिस आयुक्त कार्यालयाच्या सहकार्याने महिला दिनानिमित्त पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर विविध कार्यक्रमांसोबतच झुम्बा डान्सचे आयोजन करण्यात आले होते.


संगीताच्या तालावर व्यायामाचा एक प्रकार म्हणजे झुम्बा डान्स असून याठिकाणी उपस्थित सुमारे २०० ते २५०

विविध क्षेत्रातील महिलांनी प्रशिक्षक अश्विष लुल्ला यांच्या मार्गदर्शनात झुम्बा डान्स केला.

# Pollyactive  Care Program 2022






देशोन्नती

# 'सन्मानजनक मृत्यू व पॅलिएटीव्ह केअर' या विषयावर व्याख्यान

देशोन्नती वृत्तसंकलन...

## श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावतीचे आयोजन



**अमरावती** ■ श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय व रोटरी मिडटाऊन सुखांत पॅलिएटीव्ह केअर सेंटरच्या संयुक्त विद्यमानाने पॅलिएटीव्ह (उपशामक) सेवा जनजागृती अभियानांतर्गत व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे, प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य प्रा. प्रकाशराव देशमुख,तर प्रमुख उपस्थिती म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य प्रतापराव देशमुख,रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष व सुखांत प्रकल्प समन्वयक डॉ.बबनराव बेलसरे व श्री शिवाजी शिक्षण महाविद्याल अमरावतीचे प्राचार्य डॉ. विनय राऊत, सुखांत प्रकल्पाचे मुख्य समन्वयक रोटे विनय कडू उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी व्याख्यानामध्ये सुखांत पॅलिएटीव्ह केअर सेंटरच्या गरजेविषयी, सुखांत पॉलिएटीव्ह केअर सेंटरच्या वैशिष्ट्यांविषयी, सुखांत विविध आंतर रुग्णसेवाविषयी, भारताकरिता मोठे आव्हानासंबंधित, आयुष्याचे चार टप्पे, मृत्यूचे चार मार्ग, उपशामक रुग्णसेवा व त्यांची गरज, केअर गिव्हर प्रशिक्षणाचे प्रकार व त्याच्या विषयांचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. पुष्पलता व आभारप्रदर्शन डॉ.सरोजनी उंबरकर यांनी केले.

कार्यक्रमाला शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.

Amravati Edition
Mar 3, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# Sant Gadge Baba Punyatithi 2021

संपादक- अनिल अग्रवाल
मातृभूमि
अमरावती
संस्थापक : स्व. ब्रजलालजी बियाणी
बुधवार,दि. २२ डिसेंबर २०२१

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात अमरावती येथे वैराग्यमूर्ती

## संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी व स्वच्छता अभियान





प्रतिनिधी/२१ डिसेंबर

अमरावती-स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे सोमवार 20 डिसेंबर रोजी वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले उपरोक्त कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. पी.एस .सायर डॉ. उल्हास देशमुख डॉ. पुष्पलता देशमुख व प्रमुख उपस्थिती ही श्री मयूर चौधरी व श्री भीम बोरसे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले समाजसुधारक दीनदलित आणि पीडितांच्या सेवेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत करणारे वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज व डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन , हारार्पण व दीपप्रज्वलन करून स्मृतिदिनानिमित्त अभिवादन केले त्यानंतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी च्या वतीने वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज यांना सामूहिक आदरांजली अर्पण करण्यात आली

या कार्यक्रमाला मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे यांनी वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज हे दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाजसुधारक होते. त्यांनी लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशांतून गांजल्या- गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली.तसेच रंजले- गांजले,दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत असे त्यांचे समाजाप्रतीचे योगदान आणि त्यांच्या कार्याचे विद्यार्थ्यांनी सतत स्मरण करत करावे असा विशेष उल्लेख आपल्या भाषणात केला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती सदस्य डॉ. पुष्पलता देशमुख प्रा. जितेंद्र राऊत प्रा. सुशांत कुकडे डॉ. अनुरागिनी बोके डॉ. सरोजनी उंबरकर प्रा. संतोष कोल्हे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.

प्रतिदिन अखबार
www.pratidinakhabar.com
अमरावती, गुरुवार, 23 दिसंबर 2021

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय में संत गाडगेबाबा की पुण्यतिथि



### स्वच्छता अभियान कार्यक्रम का आयोजन

प्रतिनिधि, 22 दिसंबर

अमरावती-स्थानीय श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय में 20 दिसंबर को संत गाडगेबाबा की पुण्यतिथि मनाई गई. इस समय प्राचार्या डॉ. अंजलि ठाकरे, प्रा. डॉ. पी.एस. सायर, डॉ. उल्हास देशमुख, डॉ. पुष्पलता देशमुख उपस्थित थे. मयूर चौधरी और भीम बोरसे ने डॉ. पंजाबराव देशमुख की प्रतिमा का पूजन, माल्यार्पण, दीप प्रज्वलन कर अभिवादन किया. पश्चात सभी शिक्षकों, शिक्षकेत्तर कर्मचारियों व विद्यार्थियों ने संत गाडगे महाराज को सामूहिक आदरांजलि अर्पण की.

कार्यक्रम में मार्गदर्शन के दौरान प्राचार्या डॉ. अंजलि ठाकरे ने बताया कि दीनदलितों में अज्ञान, अंधश्रध्दा, अस्वच्छता को मिटाने के लिये कार्य करने वाले समाज सुधारक थे संत गाडगेबाबा. उन्होंने लोगों से प्राप्त चंदा से गरीबों, अनाथों के लिए महाराष्ट्र में जगह-जगह पर धर्मशाला, अनाथालय, आश्रम तथा विद्यालय शुरू किये. दीन-दुबले, अपंग, अनाथ यही उनके भगवान थे. इन्हीं भगवान में ही संत गाडगेबाबा बहुत खो जाते थे. उनका समाज के प्रति योगदान तथा उनके कार्यों को विद्यार्थियों ने लगातार स्मरण करें, ऐसा विशेष उल्लेख उन्होंने अपने संबोधन में किया. इस कार्यक्रम के सफलतार्थ आयोजन समिति की सदस्या डॉ. पुष्पलता देशमुख, प्रा. जितेंद्र राऊत, प्रा. सुशांत कुकडे, डॉ. अनुरागिनी बोके, डॉ. सरोजनी उंबरकर, प्रा. संतोष कोल्हे ने परिश्रम किये.कार्यक्रम के दौरान महाविद्यालय के सभी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व बड़ी संख्या में विद्यार्थी उपस्थित थे.

# Veters day 2022





हिंदी दैनिक

मंगल प्रहर

भरोसा वही अंदाज नया

रविवार, दिनांक 30 जनवरी 2022 ■ पृष्ठ - 8 मूल्य 5 रुपये ■ आरएनआई पंजियन क्रं.:- MAHHIN/2020/80206


## शिवाजी महाविद्यालय में मनाया राष्ट्रीय मतदाता दिवस





**अमरावती। मंगल प्रहर ब्यूरो**

स्थानीय श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय में राष्ट्रीय मतदाता दिवस के उपलक्ष्य में ऑनलाइन कार्यक्रम का आयोजन किया गया था। डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहब देशमुख की प्रतिमा को माल्यार्पण व दीप प्रज्वलन से कार्यक्रम की शुरुआत हुई। कार्यक्रम के प्रास्ताविक में स्वाती न्याहाटकर ने बताया की 25 जनवरी 2050 को भारतीय चुनाव आयोग स्थापना हुई थी। इसलिए यह दिवस राष्ट्रीय मतदाता के दिवस में मनाया जाता है। इस दिन मतदाताओं को उनके वोट की शक्ति बतायी जाती है। महाविद्यालय की प्राचार्या डॉ. अंजली ठाकरे की अध्यक्षता में आयोजित इस ऑनलाइन कार्यक्रम में प्रमुख वक्ता उपजिला चुनाव अधिकारी नरेंद्र फुलझेले सहित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित थे। राष्ट्रीय मतदाता दिवस पर लोकशाही पर निष्ठा रखने की शपथ प्रा. सुशांत कुकडे ने दिलाई। कार्यक्रम का संचालन प्रा. जितेंद्र राऊत व आभार प्रदर्शन डॉ. सरोजनी उंबरकर ने किया।

संपादक- अनिल अग्रवाल

मातृभूमि

संस्थापक : स्व. ब्रजलालजी बियाणी

अमरावती

• शनिवार, दि. २९ जानेवारी २०२२ • किंमत -४.०० रु. • पाने १२

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस

## कोरोना संक्रमणामुळे आभासी पध्दतीने आयोजन

**प्रतिनिधी/ २८ जानेवारी**

**अमरावती :** स्थानिक श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालयात २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला. यानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे, प्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते म्हणून उपजिल्हा निवडणूक अधिकारी नरेंद्र फुलझेले, मंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयातील प्रा. डॉ. पी. एस. सायर होते.



कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे शब्द सुमनाने स्वागत करून मान्यवरांचा परिचय व प्रास्ताविक स्वाती न्याहाटकर यांनी केले. महाविद्यालयांमधील बी. पी. एड प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कु. श्रुती बडेरे व डी. वाय. एड् प्रथम वर्षाचा विद्यार्थी अभिजित पवार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व वक्ते नरेंद्र फुलझेले यांनी मार्गदर्शन करताना २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्व सांगतांना या दिवशी मतदारांना त्यांच्या मताच्या शक्तीची जाणीव करून दिली जाते. लोकशाहीच्या या सणावर नागरिकांना त्यांच्या कर्तव्याची आठवण करून दिली जाते. कारण प्रत्येक नागरिकाचे मत नवा भारत घडवते. भारताची प्रगती आणि विकास हे मतदारांच्या मताने ठरवले जाते. राष्ट्रीय मतदार दिनाचे स्वतःचे खास कारण आहे की देशाचा जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाने मतदान केले पाहिजे. देशातील मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी दरवर्षी २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो. यंदा हे १२ वे वर्ष आहे. त्यानुसार २५ जानेवारी २०११ रोजी पहिला राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला असे सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे यांनी भारत देश १५ ऑगस्टला स्वतंत्र झाला असला तरी २६ जानेवारीपासून भारताचं लोकशाही पर्व खऱ्या अर्थाने सुरू झाले. भारत या दिवशी लोकशाही, सार्वभौम, गणराज्य बनला. म्हणून हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताचा सातत्यानं गौरव केला जातो. त्या लोकशाहीचा महत्त्वाचा घटक म्हणजे मतदार. म्हणून प्रजासत्ताक दिन म्हणजेच २६ जानेवारीच्या पूर्व संध्येला राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो असे अध्यक्षीय भाषणातून सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रीय मतदार दिवशी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ प्रा. सुशांत कुकडे यांनी उपस्थित सर्व मतदारांना दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. जितेंद्र राऊत व आभार प्रदर्शन डॉ. सरोजनी उंबरकर यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आभासी पद्धतीने आवर्जून उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.